# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-७०९/२०१९
दिनांक : ०६/०३/२०२०. 3132

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 628
दिनांक - 25/08/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

प्रति,
मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** Land filling of Mangroves and also illegal destruction in madh malad west Mumbai...

**संदर्भ :** १. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक यांचेकडील दिनांक १६/११/२०१९ रोजीचा ई-मेल संदेश.
२. आपलेकडील पत्र क्र. मशा/कार्या-९/वने/कावि-४०३२४/२०१९ दि. २५/११/२०१९.
३. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल दि.०२/०३/२०२०.

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र. १ व आपलेकडील संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये श्री. शैलेश राव यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० आणि १७/०९/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली करणेकामी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना कळविलेनूसार त्यांनी त्यांचेकडील संदर्भ क्र. ३ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री. शैलेश राव यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थळपाहणीच्या वेळी मंडळ अधिकारी गोरेगाव, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे प्रतिनीधी, नगर भूमापन अधिकारी गोरेगाव यांचे कार्यालयातील परिरक्षण भूमापक व तलाठी सझा गोरेगांव हे उपस्थित होते. सदर स्थळपाहणीच्या वेळी तक्रारदार श्री. शैलेश राव उपस्थित राहिले नाहीत. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात सर्वे नंबर व न.भू.क्र. तसेच जागेचा पूर्ण पत्ता याबाबत कोणत्याही गोष्टींचा उल्लेख केलेला नसल्याने संबंधित जागेचा बोध झाला नाही. त्यामुळे प्रकरणी स्थळपाहणी करता आली नाही, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आपले माहितीकरीता सविनय सादर.

Steno: update in file
DCF(Mangrove)
· VDF 17/8

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, 302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई- 01 यांना माहितीस्तव.